# प्रकरण पहिले

## राजारामबापू पाटील जीवन चरित्राचा धावता आढावा

( १९२० - १९८४ )

## प्रकरण पहिले

### : जीवन चरित्राचा धावता आढावा :

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये कै.यशवंतराव चव्हाण, कै.बाळासाहेब देसाई,कै.वसंतदादा पाटील आणि कै.राजारामबापू पाटील यांचा फार मोठा वाटा आहे. ही सर्व नेते मंडळी पूर्वीच्या दक्षिण सातारा जिल्ह्यातील होती. महाराष्ट्र हे आज एक प्रगतीशील राज्य म्हणून भारतात गणले जाते. महाराष्ट्राची आर्थिक,शैक्षणिक,सामाजिक व औद्योगिक प्रगती होण्यासाठी राजारामबापू पाटील यांचा सिंहाचावाटा आहे. राजारामबापू पाटील यांनी सांगली जिल्ह्यातील वाळवा मतदार संघाचे महाराष्ट्र विधान सभेमध्ये विस वर्षे लोकप्रतिनिधित्व केले. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळात ते महसूल ,उद्योग,वीज, ग्रामीण विकास व जनसंपर्क मंत्री म्हणून काम केले. राजारामबापू पाटील बराच काळ सक्रीय राजकारणात राहिले . मंत्री म्हणून राजसत्ता भोगली पण ही राजसत्ता त्यांनी समाजातील सर्वसामान्य माणसांच्या भल्यासाठी वापरली, अनेक लोकपयोगी निर्णय घेवून दीनदलित,खेड्यातील गोरगरीब जनतेचे हीत साधले.

राजारामबापू पाटील यांचे जीवन व कार्य महत्वाचे असून ते पुढील पिढीस प्रेरणादायी व आदर्शवत असे आहे म्हणून मी या लघुशोधनिबंधात राजारामबापू पाटील यांचे जीवन व कार्य सांगण्याचा नम्र प्रयत्न करत आहे. यासाठी मी काही मुळ साधने,तसेच महाराष्ट्र विधानसभेच्या डिबेट्सचा वापर करत आहे. तसेच राजारामबापू पाटील यांच्या जीवनावर आजपर्यन्त प्रकाशित व अप्रकाशित झालेल्या सर्व लिखाणाचा वापर करुन हा लघुशोध प्रबंध तयार केला आहे.

जन्म व बालपण --

राजारामबापू पाटील यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी झाला.[१] त्यांच्या वडिलांचे नांव अनंतदादा तर आईचे नांव पुतळाबाई असे होते, त्यांचे मूळ गांव वाळवा तालुक्यातील पुणे-बेंगलोर महामार्गावरील कासेगांव हे खेडेगांव होय. राजारामबापूंच्या रुपाने विधात्याने महाराष्ट्राला एक नवे कर्तृत्व आणि खंबीर नेतृत्व जन्माला घातले. राजारामबापू यांचे त्या काळास अनुसरुन एकत्र कुटूंब होते. अशा मोठया कुटूंबात राजारामबापू मोठे होऊ लागले. त्यांच्या बालमनावर पहिल्यापासूनच त्यांच्या आई-वडिलांनी, चुलत्यांनी चांगले सुसंस्कार केले. घरी धार्मिक वातावरण होते. त्यांचे वडिल तर पंढरपूरच्या विठोबांचे भक्त होते. प्रत्येक वर्षाला ते नियमितपणे पंढरीच्या वारीला जात. घरी देवपूजा नित्यनियमाने होत असे. त्यावेळी बालराजाराम नित्य नियमाने हजर राहत असे अशा धार्मिक व पवित्र वातावरणात राजारामबापू वाढू लागले.

शिक्षण --

राजारामला सहा वर्षे पूर्ण झाली व गुढीपाडवा त्या वर्षीचा आला. त्यांच्या चुलत्याने त्याला खांद्यावर घेतले, आईने तोंडावरुन हात फिरविला, बोटे मोडली, चुलता शाळेत गेला, शाळेत नांव दाखल केले. गुरुजींना चुलत्याने व राजारामने राम-राम केला. राजाराम गुरुजींच्या पाया पडला. शिकून मोठा हो. गुरुजींनी आर्शिवाद दिला. त्यांची गल्लीची शाळा सुरु झाली तो काळ इ.स.१९२६ चा असावा.[२] त्याचे प्राथमिक शिक्षणाची पहिली तीन वर्षे त्यांच्या जन्मगावी कासेगावीच झाले. राजाराम मन लावून शिकू लागला. वर्षाला एक इयत्ता ओलांडू लागला. राजाराम कधी शाळेतून येईल ? अशी त्याची आई रोज काळजीत असे. पुतळाबाई फार हळव्या मनाच्या होत्या. तिचे सारे लक्ष राजारामवरच असायचे, चुलत्यांचा राजारामला फार लळा त्याचेवरच सा-या घरदारांचे लक्ष. त्याच्या जन्मापासून घरी कधी कमी काहीही पडले नाही, कधी वाईट प्रसंग आला नाही. शेजारच्या बायका पुतळाबाईंना म्हणायच्या ` हो पोरगा तुझा पांग फेडील आईबापांचे नांव काढल .`

राजारामची शाळा चालू होतीच,घरी धनधान्य वाढत होते. दाणा-गोटयाला कमतरता नव्हती, आहे त्यात सर्वांचे चांगले चालले होते. संसार प्रपंच सुखाचा चालला होता,त्याचे वडील अंतू पाटील समाधानी होते. सारे भाऊ अंतू -दादाच्या सांगण्याप्रमाणे वागत होते.घरातील सर्व जावा पुतळाबाईंचा शब्द ओलांडीत नव्हत्या. राजारामचे आई-वडिल दुसऱ्यांच्या सुखासाठी राबत होते. एवढया मोठया कुटुंबाचा सटला पण घरात कधीही कुरकूर नव्हती.भांडणतंट्याचे नाव नाही.सारे गांव म्हणे घर असावे तर अंतू दादांच्या घरासारखे । संसार करावा अंतूदादाने । सटला चालवावा पुतळाबाईंनी ।

महात्मा गांधीजींच्या कार्यांचा प्रभाव --

सन १९३० चा काळ होता. टिळकांचा केसरी हा पेपर गावात येत होता. त्यांच्या विचाराप्रमाणे लोक वागत होते. सत्यशोधक चळवळीचे वारे आले होते. गांधीबाबांचे नांव गावांत ऐकू येत होते . लहान लहान चळवळी सुरु झाल्या होत्या. राजाराम यावेळी दहा वर्षाचा होता. गावात कधी फेरी निघाल्यावर गांधी-बाबांचा जयजय कार व्हायचा.त्यांचे सांगण्याप्रमाणे करावयाचे गांव.पुणे-बेंगलोर या महामार्गावर असल्यामुळे लहानमोठे पुढारी यावयाचे गांव त्यांचा सत्कार करावयाचे.यथाशक्ती मदत यावयाची त्यावेळी छोटा राजाराम चुलत्यांच्या सोबा- - वरुन हजर असावयाचा तो नाना प्रश्न त्यांना विचारायचा,वडील माणसे येईल तेवढे सांगावयाचे असहकार,परदेशी मालावर बहिष्कार,स्वदेशी चळवळ यांचे वारे गावात आले होतेच.[३]

परदेशी माल वापरावयाचा नाही.देशात तयार होणाराच माल वापरावयाचा याबद्दल गावात ठिकठिकाणी सभा होत असे.परगावाहून अनेक पुढारी सभेसाठी आले होते.चावडी चौक जनसमुदायाने भरुन गेला होता.परगावाचीही माणसे आली होती.आपला कच्चा माल इंग्रज लोक कसे फुकट नेतात त्याचाच पक्का माल तयार करुन देशाला कसे लुटतात इत्यादी खऱ्या खऱ्या गोष्टी लोकांना पटवून दिल्या. लोकांना ते सर्व पटले.लागलीच सर्व लोक भडकले त्यांनी सभेतच परदेशी

कपड्यांची होळी केली या सभेला बाल राजाराम व आपले चुलते ज्ञानुबुवा यांचे बरोबर आला होता.ज्ञानुबुवांनी आपला कोशा-पटका काढला आणि होळीत टाकला.राजारामनेही आपली जरीची किनकापी टोपी काढली व होळीत फेकून दिली.सभेच्या शेवटी स्वदेशीची प्रतिज्ञा सर्वांनी घेतली.महात्मा गांधीजीचा जयजयकार झाला.[४] यावरुन बाल वयापासून त्यांच्या ठायी देशनिष्ठा व मातृ-भूमीसाठी किती जाज्वल प्रेम होते ते दिसते.

सभा संपल्यानंतर वंदे मातृरम् गीत झाले. भारत मातेचा जयजयकार झाला.सर्व माणसे घरी परतू लागली.छोटा राजारामही ज्ञानुबुवाबरोबर घरी येत होता.तो चुलत्याला सारखे प्रश्न विचारत होता.राजारामाला भागवत धर्माची शिकवण,एकत्र कुटूंबाचा बंधूभाव,सर्वासाठी कष्ट करण्याची तयारी आहे त्यात समाधान मानण्याची वृत्ती,स्वातंत्र्य चळवळीतील आरंभीची झुळूक त्याचे बाळकडू आरंभापासून मिळालेले होते. पुढे मोठेपणी राजारमने जीवापाड जपलेले आपणास दिसून येते.[५]

मुलकी परीक्षा --

राजारामबापूंचे प्रारंभिक शिक्षण इयत्ता सहावी पर्यन्त कासेगावात चालू होते.पुढे सातवी परीक्षा (मुलकी ) ते नेर्ले तून पास झाले.सहावी परीक्षा पास झाले. त्यावेळचा पुढील प्रसंग राजारामने आपल्या जागेवर उड्या मारल्या व हाताने ओरडतच टाळ्या वाजविल्या. गुरुजींना नमस्कार करुन तो वाऱ्यासारखा घराकडे पळू लागला व ही आनंदाची बातमी कधी घरातील सर्वांना सांगतोय असे त्याला वाटू लागले.आज शाळेत पास नापास सांगितले होते. राजाराम अतिशय चांगल्या मार्कांनी सहावी पास झाला होता व तो इयत्ता सातवीत गेला होता.[६]

त्या काळात सातवीत जाणे म्हणजे फार मोठे शिक्षण मानले जात होते. अशा मुलाला व घरातील सर्वांना मोठेपणा वाटत असे. आताच्या सारख्या शाळा पूर्वीच्या काळी नव्हत्या.मोठ्या खेड्यात चौथी पर्यन्त कसे तरी वर्ग असायचे

वीस पंचवीस मैलावर एखाद्या मोठ्या गावात सातवीपर्यंन्त शाळा असायची पण मोठ्या कष्टाने ती चालू असायची. वर्गात दहा-पंधरा मुले असत व ती पण गावची व परगावची मिळून असत. बहुजन समाजातील मुले शाळा शिकायची नाहीत. इतर गावी पहिली म्हणजे फार मोठे शिक्षण शेतीत राबावे मिळेल ते खाऊन कसे तरी जगावे अशी भावना त्यावेळच्या अनेक लोकांची होती. थोरामोठयांच्या मुलांनी शिकावे ही कल्पना समाजामध्ये असल्याने व परिस्थितीच्या मानाने खर्च जास्त करावा लागत असल्याने शिक्षणापासून बराच मोठा समाज वंचीत राहिला होता. त्यामुळे ब-याच होतकरु मुलांना हुषार पण गरीब म्हणून पुढे शिक्षण घेता येत नव्हते. मग हायस्कूलचे नांव तर बाजूलाच ? तालुक्याच्या ठिकाणी हायस्कूल सांगली, कोल्हापुर व पुणे येथे कॉलेजचे शिक्षण सामान्य माणसाला परवडणारे नव्हते मग गरीब विद्यार्थी कसा शिकणार ? राजारामच्या घरातील आर्थिक परिस्थितीसुध्दा सामान्य अशीच होती. राजाराम घरी आला. विठ्ठलाला साष्टांग नमस्कार घातला. तो आईच्या पाया पडला, सातवी पास झाला हे ऐकून त्यांच्या मातोश्रीस मुलगा फार शिकला त्याला कुठे ठेवू ? कुठे नको ? असे झाले. पुतळा - बाईना आनंदाश्रू आले त्यात तिला राजाराममध्ये १० दिव्यस्वरुप दिसले. अंतू पाटील सोप्यात होते. राजारामने दादांचे दर्शन घेतले. दादांनी पाठीवरुन हात फिरवित मोठा हो आणखी पुढे शीक असा आर्शिवाद दिला. संताचाच आर्शिवाद तो खोटा ठरणार तरी कसा ? राजारामने वडीलांची परवानगी घेतली व तो शेताकडे निघाला कारण त्याचे चुलते दाजी, बापू, आप्पा व बुवा शेतात होते. त्यांना ही आनंदाची बातमी सांगायची होती. टेकावरील शेतात आप्पा, बुवा होते. बांमळीच्या शेतात दाजी व बापू होते. तेथे तो गेला व चुलत्यांच्या पाया पडला. राजाराम तु पुढे शीक घराण्याचे नाव काढ, आम्ही दुस-याची शेती करु, उपाशी राहू। पण तुला काहीही कमी पडू देणार नाही, सा-या चुलत्यांनी त्याला सांगितले. तोंडावरुन व पाठीवरुन हात फिरविला, ते हात कष्टाचे होते त्यात प्रेम होते आशा होती, व सर्व काही होते.

टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण मिळत नसते. काठयाकुटयातून

गेल्याशिवाय प्रगती होत नाही. दु:ख,कष्ट,त्रास,हाल,वनवास सोसल्याशिवाय मोठेपण मिळत नाही, राजारामच्याही बाबतीत आगदी तसेच झाले.त्यावर्षी गावात प्लेगाची साथ आली होती.संपूर्ण गाव ओस पडले होते. सरकारने शाळा बंद केली होती.राजारामच्या पुढच्या शिक्षणाचा प्रश्न सर्वांपुढे उभा राहिला. राजाराम ने तर आपल्या गावची हद्द पण कधीही ओलांडलेली नव्हती,त्यात राजाराम हा तर एकुलता एक मुलगा सर्वांचा अतिशय लाडका.संध्याकाळी सर्वजन घरी बसले. राजारामने शाळा बंद करु नये पुढे शिकत राहावे व त्याला सर्वांनी सहकार्य करणेचे ठरले.[७]

कासेगांव पासून नेर्ले तीन मैल अंतरावर होते.तीन मैल चालत जावे,चालत यावे असे सुरु झाले.राजाराम पहाटे उठून आपले आटपून तयार असायचा.आई पोत्यांच्या खोळेत भाकरी बांधून घ्यावयाची राजाराम पाटी दप्तर घ्यावयाचा आई भाकरीसह पोत्याची खोळ डोक्यावर ठेवायची तोंडावरुन हात फिरवायची राजाराम देवघरात जावयाचा दादांचे व विठ्ठलाचे दर्शन घ्यावयाचा दादा गंध व अबीर लावायचे जातो म्हणून सांगून सकाळी सहाला राजाराम घर सोडत असे. आई उभी राहून राजाराम दिसेपर्यन्त डोळेभरुन तो दिसेनासा होईपर्यन्त पहात असे. त्यानंतर डोळ्याला पदर लावून जड अंत:करणाने घरात येवून दिवसभर तिचा हात कामाला लागायचा पण तिचे मन मात्र राजाराम भोवतीच असायचे .राजाराम परत घरात येईपर्यन्त तिचा जीवातजीव नसायचा. एखाद्या दिवशी येण्यास जर राजारामला उशिर झाला तर लगेच कोणीतरी त्यास आणण्यास पाठविले जात असे. अशा अनेक यातना सहन करीत राजाराम इ.स.१९३५ मध्ये नेर्ले गावातून सातवी पास झाला.घरच्या सर्व माणसांना जसा आनंद झाला तसाच पुढील शिक्षणाचा भयंकर प्रश्न उपस्थित झाला.[८]

माध्यमिक शिक्षण --

राजाराम हे सातवी पास झाले आणि त्याचे पुढच्या शिक्षणाचे घोडे अडले.जवळपास हायस्कूलच्या शिक्षणाची सोय नव्हती.मोठया शहरात हायस्कूलचे

शिक्षण मिळत असे पण तेथे राहून शिकण्याची ऐपत नव्हती. पण राजारामने पुढे शिकण्याची व घरच्या माणसांची शिकविण्याची इच्छा होती. सर्वजन पुढच्या शिक्षणाच्या काळजीत पडले होते. विचार करीत होते. परंतु चांगल्या गोष्टीला मार्ग सापडतो तसे झाले. पुण्याला शिवाजी मराठा संस्थेचे बोर्डींग होते व हायस्कूलही होते. तेथे राहण्याची जेवणाची व शिकण्याची सोय होती. राजारामच्या नशीबाने मोहीते मास्तरांनी राजारामला पुण्याला नेले व पुढच्या शिक्षणाची सोय झाली.

पुण्यातील शिक्षणासाठी वास्तव्य --

पहाटे लवकर उठावे, अभ्यास करावा नेमून दिलेली वसतिगृहाची कामे व्यवस्थित करावीत आकरा वाजता हायस्कूलमध्ये जावे मन लावून शिकावे. रात्री अभ्यास भरपूर करावा असा नित्यक्रम सुरु झाला. राजाराम बरोबर बोर्डींगमध्ये आलेली मुले वस्तीगृहाची कामे निभेना म्हणून वस्तीगृह सोडून आपआपल्याला घरी निघून गेली होती पण राजारामची जिद्द मोठी होती. कष्ट करण्याची, त्रास सहन करण्याची मनापासून तयारी होती. रात्री कपडे धुवावे, सकाळी घालावे, एकच संतरंजी व एकच चादर यावरच राजाराम दिवस काढीत असे, पुढे वरच्या वर्गात गेल्यानंतर त्याना पैसे कमी पडू लागले त्यामुळे ते शिकवण्या घेवू लागले. शिकत असतानाच सकाळी प्राथमिक शिक्षकाची नोकरी करुन पैसे मिळवून व दुपारी हायस्कूलचे शिक्षण घ्यावे लागत होते.[९]

गरीब पण शिक्षणासाठी तळमळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वाटयाला जी दु:खे येतात, हालअपेष्टा भोगावे लागतात. त्या संपूर्ण यातना राजारामने सहन केलेल्या होत्या. ''मुशीतच खऱ्या सोन्याची परीक्षा होते '' तसेच घडले आहे. शिक्षणासाठी त्यांनी हाडाची काडे केली पण शिक्षणाबाबत कधीच कुचराई केली नाही म्हणून त्यांना यश आले. श्री. शिवाजी मराठा हायस्कुल पुणे येथूनच ते इ.स. १९४० मध्ये मॅट्रीकची परीक्षा अतिशय चांगल्या मार्कांने पास झाले. अतिकष्टामुळे त्यांना ते यश प्राप्त झाले.[१०]

महाविद्यालयीन शिक्षण --

सामान्य परिस्थितीतील मुलगा मॅट्रीक परीक्षा पास म्हणजे त्यावेळी फार मोठे शिक्षण मानले जात होते. अशा मुलाला चांगली नोकरी ताबडतोब मिळत असे.पण पुढे कॉलेजचे शिक्षण घ्यावे अशी राजारामची तीव्र इच्छा होती. हायस्कूलचे शिक्षण पूर्ण करे. पर्यन्त घरची सर्व माणसे पैशाला मेटाकुटीस आली होती.कॉलेजच्या शिक्षणासाठी पैशाची मुळीच ताकद नव्हती व त्यातच पुण्याला कॉलेजची सोय होती पण बाहेरचे काम करुन सुध्दा कॉलेजचा खर्च त्यांना परवड--णारा नव्हता त्याकाळी ' रुपयाची किंमत गाडीच्या चाकाएवढी दिसत होती' राजारामचा मूळचा पिंड धडपड्या होता ते गप्प बसले नाहीत त्यांनी सरळ बडोदा संस्थान गाठले .[११]

बडोदा येथे महाविद्यालयीन शिक्षण --

बडोद्याचे सयाजीराव गायकवाड हे खरोखरच गरीबांचे कैवारी व शिक्षण प्रेमी होते ते गरीब व हुषार मुलांचे आश्रयदाते होते. त्यांनी अनेक सामाजिक व शैक्षणिक सुधारणा आपल्या बडोदा संस्थानामध्ये केल्या होत्या. त्याबरोबरच गरीब मुलांच्या कॉलेज शिक्षणाची सोय ही केली होती.तेथे जाऊन राजारामने खूप कष्ट घेतले.यावेळी त्यांना तालमीचा नाद होता.मुळचे राजबिंड शरीर त्यांनी पैलवानी बनविले.त्यामुळेच ते कॉलेजचे कुस्तीचे चॅम्पियन झाले.राजाराम अनंत उर्फ आर.ए- पाटील बडोद्यालाच इ.स.१९४२ मध्ये इंटर परीक्षा पास झाले.[१२]

कोल्हापूरला साईक्स लॉ कॉलेजमध्ये दाखल --

राजारामबापू बडोद्याला इंटर परीक्षा पास झाल्यानंतर घरच्या परिस्थितीमुळे कोल्हापूरला साईक्स लॉ कॉलेजमध्ये दाखल झाले.आणि १९४५ मध्ये ते वकीलीचे पदवीधर झाले.त्यांच्या गावात,मागात व तालुक्यात तेच पहिले कायद्याचे पदवीधर होते. त्याचे सगळीकडे कौतुक होऊ लागले.[१३]

१९४२ च्या स्वातंत्र्य लढयात सहभाग --

राजारामबापूंच्या धडपडीच्या शिक्षणकाळातच अखेरचा स्वातंत्र्य लढा मोठा हिरीरीने चालू होता. ' छोडो हिंदुस्थान ' अशी निर्वाणीची ताकीद इंग्रजांना राष्ट्रपिता महात्मा गांधीजीनी दिली होती. त्यामुळे संपूर्ण हिंदुस्थान स्वातंत्र्याचे प्रेरीत होऊन इंग्रजाविरुध्द पेटून उठला होता. इंग्रजांच्या अन्याय, अत्याचाराला हिंदुस्थानमधील लोक कसलीही दाद देत नव्हते. त्यांच्या काळ्या कायद्याला जनता भित नव्हती. इंग्रज सरकारला सळो की पळो असे झाले होते. भारतमातेचा आणि स्वातंत्र्याचा जयजयकार संपूर्ण देशभर चालला होता अशा वेळीच राजारामबापू पाटील यांचे तरुण रक्त कसे गप्प बसणार ? कॉलेजमध्ये असतानाच युवक चळवळीत आणि सेवादलात त्यांचा प्रामुख्याने भाग होताच .गावी आले म्हणजे त्यांचा आणि क्रांतीकारक देशबांधवाचा संबंध नेहमीच येत असे.[१४]

सामाजिक कार्याची मुहूर्तमेढ --

क्रांतीकारकांचा वाळवे तालुका राजारामबापू पाटील यांचे कासेगांव तर त्याचा मुख्य अड्डाच होता. पश्चिमेला वाटेगांव व पूर्वेला कुंडल ही स्वातंत्र्य लढयातील मुख्य केन्द्रे होते. ही क्रांतीकेन्द्रे इंग्रजांची पार्लमेन्ट हालवीत होती व त्याची झोपही उडवित होते. राजाराम पाटील यांचे विधायक कार्य त्यांच्या गावात सुरु झाले होते. त्यांनी गावात वाचनालय सुरु केले. चरखा संघ सुरु करुन सूत काढण्याची व खादी वापरण्याची दिक्षा त्यांनी गावाला दिली. हरिजनांच्या बरोबर सहभोजने घडवून आणि तसाच त्यांना मंदीर-प्रवेश मिळवून दिला. अधून मधून वाटेगांवच्या डोंगरामध्ये ते क्रांतीकारकाना भेटत होते. त्यांना आपले राष्ट्रीय कार्य सांगत होते व भावी कार्याची स्फूर्ती घेऊन येत होते. पोलिसांच्या ससेमिऱ्याला ते दाद देत नव्हते. गरीब, सामान्य दलित, पीडित, जनतेला समजावीत होते. त्यांना स्वातंत्र्याचे महत्व पटवून देत होते. कारण त्यांच्यासारखी दु:खे त्यांनी अनुभवली होती ती दूर त्यांना करावयाची होती व त्यासाठी ते सतत कार्यरत रहात होते.[१५]

इ.स.१९४५ साल उजाडलेले होते. हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा जोर

अधिक वाढला होता.` करेंगें या मरेंगे ` अशी हिंदुस्थानमधील लोकांची जिद्द होती.इंग्रज सरकार या घोषणेमुळे घाबरलेले होते व आपणास हिंदुस्थानातून परत जावे लागणार हे इंग्रजाना माहित झाले होते तशी त्यांची तयारीही सुरु होती.

राजारामबापूंचे सुरुवातीचे विधायक कार्य —

श्री राजारामबापू पाटील कायद्याचे पदवीधर झाले.त्यांनी एल.एल.बी.ची परीक्षा उत्तम रितीने पास केली ,ही परीक्षा दिल्यानंतर मनुष्य वकील होतो व सो-याने पैसा मिळवितो.समाजात मोठा मान वकीलाला असतो.राजारामबापू पाटील गावी कासेगांवला आले व विधायक कामे करु लागले.त्यांच्या मनात एक प्रश्न सारखा येत होता.नोकरीपेक्षा,वकीली करण्यापेक्षा,देशासाठी काहीतरी करावे परंतु त्यांच्या घरची परिस्थिती तुटपूंजी होती.गरीबीची होती.आई,वडिल व चुलते यांच्या अपेक्षा ` राजाराम` कडून मोठया होत्या.कारण घराण्यात,गावात व भागात राजाराम इतका कोणीही शिकला नव्हता.मुलाने घराचे पांग फेडावेत अशी सर्वांची इच्छा होती. परंतु राजारामबापू भारतमातेचे ,पांग फेडावे ।तिची सेवा करावी, या विचारात गढून गेले होते व त्यांनी तसे कामही सुरु केले होते.[१६]

जी माणसे थोर असतात,विचाराने मोठी असतात त्यांना पुढचे दिसते असे म्हणतात.अशी माणसे स्वत:चे काहीच करीत नाहीत.जगाचेच सारे करीत असतात व त्यासाठीच त्यांचा जन्म झालेला असतो .अशा माणसांपैकी पुज्य सानेगुरुजी होऊन गेले.त्यांनी स्वातंत्र्य लढयात भाग घेतला होता.त्यांनी कित्येकदा तुरुंगवास पत्करला होता. त्यांनी मुलांच्यासाठी व स्त्रियांच्यासाठी खूप महत्वपूर्ण पुस्तके लिहून अनेक विधायक कार्ये केली होती.त्यांनी जग हाच आपला संसार मानला होता.अशा थोर माणसांना पुढील काळ दिसून येत असतो.पुढे काय होणार हे ते जाणवतात.इंग्रज सरकार आता लवकरच जाणार .आपला प्रिय देश स्वतंत्र होणार स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण कार्य केले पाहिजे हे त्यांनी जाणले होते व पुढील महत्वाच्या काळातील अनेक कामे हळुहळू लोकांना समजावून सांगितल्या पाहिजेत. यासाठी त्यांनी सांगली,सातारा या जागृत क्रांतीच्या भागाची निवड केली कारण

येथेच मोठी चळवळ होती.येथील लोक जागृत होते म्हणून त्यांनी कासेगांवला क्रांतीकारकाच्या अड्ड्यात प्रथम सभा घेतली.` स्वातंत्र्यानंतरची जबाबदारी` हा सानेगुरुजींचा मुख्य विषय होता.[१७]

कासेगाव येथे साने गुरुजींची सभा जाहीर झाली पण अजून इंग्रजांचा त्रास कमी झालेला नव्हता .क्रांतीकारक इंग्रजांना दाद देत नव्हते.तरीही त्यांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.गावाशेजारी डाकबंगला आहे.तिथे मिलिटरी आणून ठेवली होतीदहशत निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु होता पण त्यांना न घाबरता, लाऊड स्पीकर किंवा स्टेज यांचा वापर न करता कासेगांव व त्यांच्या जवळपासच्या खेड्यातील जवळजवळ वीस हजार लोक साने गुरुजींची अमृतवाणी ऐकण्यास आले होते व त्यांनी शांततेने मोठया उत्साहाने सभा पार पाडली होती.[१८]

स्वातंत्र्यानंतर प्रत्येकाने आपले आवडते क्षेत्र निवडून त्यातच त्यागपूर्वक देशाच्या नव निर्मितीचे काम करावे,विधायक कामानेच देश मोठा होता हा पुज्य साने गुरुजींचा अमृतवाणीचा संदेश होता. राजाराम पाटील यांची कर्तबगारी, धडाडी,चिकाटी व केलेले प्रत्यक्ष काम पाहून पुज्य साने गुरुजींनी सभेच्या शेवटी सांगितले की` हा धडपडणारा मुलगा राजाराम पाटील,देशाचा महान पुढारी होईल ` पुज्य सानेगुरुजींची देववाणी,त्याचा आशिर्वाद खोटा कसा ठरेल[१९] पुढे ती भविष्यवाणी खरी ठरली.

तेव्हा पासूनच राजारामबापू पाटील या तरुण व उमदा तरुणाने, वकीलाने देशाची,समाजाची वकीली पत्करली.त्याचे साठीच आपले संपूर्ण आयुष्य दिले आहे. जनाजनार्दन हे मानले आहे.त्यांचीच मनोभावे सेवा राजारामबापू पाटील यांची सुरु झाली,ती पण अखंड मिळेल तेथे मिळेल त्या साधनातून.

एखादे टूमदार डेरेदार आम्ब्यांचे झाड असावे त्याच्या थंडगार छायेत उन्हाची माणसे झोपावीत,जनावरांनी विश्रांती घ्यावी पक्ष्यांनी आपला आनंदी संसार उभारावा,गोड मधुर आंबे मनसोक्त खाऊन तृप्त व्हावे आणि या आम्ब्यांच्या झाडास आनंदाने धन्यवाद द्यावेत तसे राजारामबापू पाटील यांच्या समाजसेवेच्या सुरुवातीला शुभारंभ झाला.[२०]

पुज्य सानेगुरुजींचे मातृहृदय,मधूर अमृतवाणी आणि त्यांची देवमूर्ती राजारामबापू पाटील यांच्या समोर रात्रंदिवस दिसत होती व त्यामुळे ते जगाला विसरुन एकरुप झाले होते.त्यांच्यावर गुरुजींच्या विचारांचा,त्यांच्या कार्याचा खोल ठसा उमटला होता.क्रांतीकारक वाळवे तालुक्यात त्यावेळच्या वातावरणाने ते भारावून गेले होते.राजारामबापू पाटील यांनी आपल्या घरातील सर्व आशा-अपेक्षा बाजूला सारल्या आणि देशसेवेला वाहून घेणे हा निश्चय पक्का केला पण कोणत्या प्रकारे,कोणत्या साधनांनी समाजसेवा करावयाची कशी ? हा प्रश्न तीव्रतेने त्यांचेपुढे उभा राहिला. सेवेला मार्ग सापडतोच त्याप्रमाणे त्यांना मार्ग दिसला.[२१]

शैक्षणिक कार्यास सुरुवात --

राजारामबापू पाटील यांना शिक्षणासाठी नेर्ले, पुणे, बडोदे,व कोल्हापूर अशा ठिकठिकाणी फिरावे लागले होते. त्यामध्ये त्यांना अतिशय मोठे कष्ट सोसावे लागले होते. गरीब परिस्थितीचे चटके सहन केले होते. सर्व मुले हुषार असतात,हिम्मतबाज असतात पण केवळ पैसा नसल्यामुळे गरीब मुलांची आयुष्ये मातीमोल होतात ही खंत राजारामबापू पाटील यांना सदैव वाटत होती कारण त्यांना स्वत:ला अनुभव आलेला होता.त्याच बरोबर सर्व सुधारणेचे मुळकेन्द्र शिक्षणात आहे हे राजारामबापूंनी ओळखले आणि शिक्षण सेवेतून समाजसेवेला त्यांनी शुभारंभ केला.[२२]

त्यावेळी वाळवे तालुक्यात फक्त इस्लामपूरला एक हायस्कूल होते,त्या हायस्कूलचा खर्च सर्वसामान्य माणसांना पेलत नव्हता.आताच्या सारख्या त्याकाळा-मध्ये सोई सवलती काहीच नव्हत्या,शिक्षणाला वाहून घेणे हायस्कूल चालविणे म्हणजे एक दिव्यच होते ,महान तपश्चर्या होती.राजारामबापू पाटील यांनी कासेगांवला सर्वात प्रथम ग्रामीण भागात क्रांतीकारकांच्या व भूमिगत कार्यकर्त्यांच्या म्हणजेच मा.बर्डे गुरुजी,मा.पांडू मास्तर,मा.बाबूजी पाटणकर,मा.दादा धन्वंतरी यांच्या सहकार्यामुळेच बापू हे शिक्षण संस्थेकडे वळले व त्यांनी ही जबाबदारी मोठया कष्टाने पार पाडली.त्यांनी इ.स.१९४५ मध्ये कासेगांव शिक्षण संस्थेची स्थापना केली.[२३]

कासेगांव या खेड्यामध्ये त्यांनी प्रथमच एका हायस्कूलची स्थापना केली. इ.स.१९४५ मध्ये हिंदुस्थानमर देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आझादीची चळवळ चालू होती म्हणून राजारामबापू पाटील यांनी आपल्या हायस्कूलचे नांव 'आझाद विद्यालय' असे ठेवले.[२४]

आझाद विद्यालयाची स्थापना केल्यानंतर कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता त्यांनी शिक्षक म्हणून काम केले. अनेक प्रकारच्या मदती गोळा करु लागले. एक ध्येय, एक काम, एक ध्यास त्यांचा होता. शिक्षण संस्थेचे काम व्यवस्थितपणे चालावे यासाठी त्यांनी रात्रंदिवस कष्ट सोसले. विद्यालय चालविताना सर्वच गोष्टींच्या त्याच्यापुढे अनंत अडचणी होत्या. त्या त्यांनी धैर्याने, कष्टाने, त्यागाने सोडविल्या याच विद्यालयाला जोडून त्यांनी एका छोटयाशा देवळात गरीब मुलांच्या राहण्याची व जेवनाची सोय उपलब्ध करुन त्यांना मोफत शिक्षण दिले जावे या भूमिकेतून त्यांनी एका वसतिगृहाची स्थापना केली. त्यावेळी विनोबा भावे यांची सर्वोदय चळवळ सुरु होती. म्हणून आपल्या वसतिगृहाचे नाव 'सर्वोदय वसतिगृह' असे ठेवले. सर्वोदय म्हणजे सर्वांचा सहभाग, सर्वांना उपयोगी पडावे, सर्वांचा विकास व्हावा या हेतूने या वसतिगृहाची स्थापना इ.स.१९४६ मध्ये करण्यात आली.[२५]

त्यानंतर त्यांनी वाळवे तालुक्यातील वाटेगांव येथे 'वाटेश्वर हायस्कूल' पेठ नाका येथे 'न्यू इंग्लिश स्कूल' इस्लामपूर येथे 'यशवंत हायस्कूल', कापूस पेड येथे जवाहर विद्यालय, तांबवे येथे महाराष्ट्र हायस्कूल अशी अनेक विद्यालये स्थापन केली, तर आष्टा येथे आर्टस, कॉमर्स कॉलेज स्थापन करुन तालुक्यातील सर्व मुला-मुलींना शिक्षण मिळावे यासाठी अविरत प्रयत्न केले.[२६]

सातारा जिल्हा स्कूल बोर्डाचे चेअरमन म्हणून निवड --

राजारामबापू पाटील यांचे शैक्षणिक कार्य राबविण्याची विधायक तळमळ, वाटेल ते कष्ट करण्याची तयारी, प्रामाणिक व प्रेमळ स्वभाव पाहून इ.स.१९४६ मध्ये त्यांची निवड सातारा बोर्डावर बिनविरोध झाली. या होतकरु तरुणावर सातारा स्कूल बोर्डाच्या चेअरमनपदाची जबाबदारी आली.[२७]

पुढे दक्षिण सातारा आताच्या सांगली जिल्हाचेही स्कूल बोर्डाचे चेअरमन म्हणून त्यांचीच एकमताने निवड झाली.या काळात राजारामबापूंनी सक्तिने शिक्षणाचा प्रसार व प्रचार विद्यार्थी पालक व शिक्षक यांचे मेळावे,सभा संम्मेलने घेवून फार मोठा शैक्षणिक उठाव केला व पक्का शैक्षणिक पाया घातला. राजारामबापू पाटील जसे उत्तम प्रशासक होते तसेच ते आदर्श शिक्षकही होते, त्यांना मुलांचे जग व शैक्षणिक वातावरण मनापासून आवडत होते म्हणून त्यांनी अनेक खेडेगांवामध्ये शाळा ( हायस्कूल ) सुरु केले होते.

पुढे त्यांनी इंग्रजी शिक्षण व सक्तीचे शिक्षण यांचा नेहमीच पुरस्कार केला, पुणे विद्यापीठावर सदस्य असताना त्यांनी खेडेगावातील आडचणी स्पष्टपणे मांडून त्या सोडविण्याचा कसोसीने प्रयत्न केला.[२८]

सुधारक पध्दतीने विवाह ( १९४६ )

राजाराम बापूंचा विवाह वयाच्या सविसाव्या वर्षी झाला.राजारामबापू यांनी कोणत्याही आकर्षणाला व लोभाला बळी न पडता चरेगांव ता,कराड, जि:सातारा येथील श्री आनंदराव माने यांच्या कन्येशी कुसूमताई यांच्या बरोबर सुधारक पध्दतीने विवाह २६ मे १९४६ ला केला.सौ.कुसूमताई या घरंदाज घराण्यातील होत्या.त्यांचे विचार मा.बापूंच्या विचारांशी जुळले व दोघांचा संसार सुखाचा व समाधानाचा झाला.दोघांत कसलेही मतभेद झाले नाहीत,त्यामुळे मा.बापू सर्व वेळ सार्वजनिक कार्यात घालवू शकले.[२९]

सांगली जिल्हा लोकल बोर्डाचे प्रसिडेंट ( १९५२ ते १९६२ )

इ.स.१९५१ मधील दक्षिण सातारा ( सांगली ) जिल्हा स्कूल बोर्डातील चेअरमन असताना त्यांनी केलेल्या कार्याची पोचपावती त्यांना १९५२ मध्ये सांगली जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष म्हणून देण्यात आली.कै.राजारामबापू पाटील इ.स. १९५२ ते १९६२ पर्यन्त सांगली जिल्हा लोकल बोर्डाचे प्रसिडेंट होते.[३०]

सांगली जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर राजारामबापूंनी बोर्डाची जबाबदारी यशस्वीरित्या सांभाळून दाखविली.त्यांनी

आपले कर्तव्य इतके प्रामाणिकपणे बजावले त्यामुळेच त्यांना सलग दहा वर्षे अध्यक्ष म्हणून त्याठिकाणी राहावे लागले. त्यांच्या या प्रामाणिकपणामुळे त्यांच्या लोकप्रियतेची आणि कर्तबगारीची आठवण होते. अध्यक्ष पदाची सूत्रे हातामध्ये घेतल्यानंतर त्यांनी सरकारला आपले मत योग्य प्रकारे समजून देऊन जास्तीत जास्त पैसा मिळविला व सांगली बोर्डाची आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला.[३१]

राजारामबापू पाटील यांनी सांगली जिल्हा लोकल बोर्ड सतत दहा वर्षे आपल्या अध्यक्षतेखाली ठेवले. या काळात त्यांनी शिक्षण, नदीकाठावरील गांवाना नावा, पिण्याच्या पाण्याचे आड, वाचनालये, जोड रस्ते, पंचायत घरे, आरोग्य, दळणवळण इत्यादी महत्वपूर्ण क्षेत्रात अनेक सुधारणा केल्या. त्यांनी गावोगावी शाळा बांधल्या. रस्ते तयार केले. लोकांच्या आरोग्य रक्षणाच्या सोई उपलब्ध करुन दिल्या. शिक्षक लोकांची बाजू उचलून धरली. ते सर्वसामान्य लोकांचे काम अतिशय जिद्दीने पार पाडीत असल्यामुळेच त्याचे सांगली जिल्ह्यातील राजकारणात स्थान निश्चित झाले.[३२]

सांगली लोकल बोर्डाच्या कारकिर्दीत राजारामबापू पाटील यांना आपल्या सहका-यांचा एकमेव व पूर्ण पाठींबा होता. त्यांनी सरकारी अधिका-यांचे सहकार्य व सहानुभूती संपादन करुन अमोल अशी कामगिरी केली. त्याचे कुशल नेतृत्व सर्व गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी होते. त्यांची कामे करण्याची तयारी व चिकाटी, तळमळ व प्रेम पाहून कॉंग्रेस सरकारने व इतर संस्थानी खालील कमिट्यावर सभासद किंवा चेअरमन म्हणून त्यांची नेमणूक केली होती.[३३]

१) १९५७ - सांगली जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष.

२) १९५८ - अखिल भारतीय तंबाखू कमिटीवर शेतकरी प्रतिनिधी म्हणून निवड.

३) १९५८ - पुणे विभाग पंचायत मंडळाचे उपाध्यक्ष.

४) १९५८ - महाराष्ट्र स्टेट हौसिंग फायनान्स बोर्डाचे चेअरमन.

५) १९५८ - पुणे विद्यापीठ कोर्टाचे सदस्य.

६) १९५९ - महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष.

७)    १९५९    - सांगली येथील शेतकरी सहकारी साखर कारखाना निर्मितीत पुढाकार व संचालक.

८)    १९६१    - शिवाजी विद्यापीठ स्थापना समितीचे सदस्य व सिनेटर.

९)    १९६२    - वाळवा मतदार संघातून विधानसभेवर निवड.

सांगली जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षापदी असताना त्यांनी वरील सर्व ठिकाणी जिल्ह्यातील जनतेची सेवा करण्याचा प्रयत्न केला.[३४]

महाराष्ट्र विधान सभा सदस्य ( १९६२ ) -

सन १९६२ मध्ये राजारामबापू पाटील वाळवा मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेले. त्यावेळेपासून त्यांनी अखंडपणे बावीस वर्षे याच मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले. आणि लोकप्रतिनिधि म्हणून त्यांनी मतदार संघासाठी जे काही केले,त्याचीच परतफेड म्हणून लोकांनी त्यांना विलक्षण असे प्रेम दिले.उदंड माया दिली.पंडित जवाहरलाल नेहरु यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन या लोकांच्या लोकनेत्यांने कामाला सुरुवात केली. वाळवा भागाचा सर्वांगिन विकास व्हावा,ग्रामीण भागात सहकारी उद्योगधंदे सुरु व्हावेत यासाठी वाळवा सहकारी दूध संघ, वाळवा सहकारी बॅन्क,वाळवा सहकारी साखर कारखाना,वाळवा ग्राहक भांडार व वाळवा सुत गिरणी इत्यादी प्रकल्प सुरु केले.[३५]

उपमंत्री --

सन १९६२ च्या मा.श्री यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात मा.राजारामबापू पाटील यांची महसूल व वनउपमंत्री म्हणून पहिल्यादा निवड झाली.त्यांची व्यासंगी वृत्ती,विनम्र व स्नेहशिल स्वभाव आणि विधानसभेच्या सभागृहामध्ये महसूल व वनखात्यासंबंधी सभासदांनी मांडलेल्या अन्याय गा-हाण्यांचे व तक्रारींचे निवारण करण्याची त्यांची तत्परता इत्यादी गुणवैशिष्टयामुळेच मा.बापू सत्ताधारी व विरोधी पक्षीय आमदारांच्यामध्ये थोड्याच कालावधीत लोकप्रिय बनले.[३६]

महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री --

सन १९६५ मध्ये महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात कॅबिनेट दर्जाचे महसूल मंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली. सन १९६५ साली त्यावेळचे मुख्यमंत्री मा.नामदार कै.वसंतराव नाईक यांनी त्यांना नियुक्त केले होते. केवळ आडीज वर्षात उपमंत्री पदावरुन कॅबिनेट दर्जाचे मंत्रिमंद मिळाल्याचे हे एक अतिशय दुर्मिळ उदाहरण आहे. त्या काळात संबंधित खात्याविषयीचे काम मंत्री अथवा उपमंत्री सभागृहामध्ये कितपत समर्थपणे व समाधानकारकपणे कामे करतात यावर त्याचे खाते किंवा पदोन्नती बंव्हशी अवलबून असे त्या काळी महाराष्ट्र मंत्रिमंडळ द्विस्तरीय मंत्री व उपमंत्री या दोन स्तरांचे असे मा.बापूनी आपल्या अंगी असलेल्या कार्यक्षमतेचा निरलसपणे सदैव उपयोग करुन घेत असताना त्याला आपल्या निगर्वी,प्रेमळ व मनमिळाऊ स्वभावाची जोड दिली.या असाधारण वैशिष्ट्यांच्या जोरावरच मा.बापू उपमंत्र्यांचे मंत्री झाले. केवळ संबंधित वरिष्ठांच्या समोर लाचार होऊन सत्ता स्थान संपादनाच्या अहमहमिकेत मा.बापू कधीही सहभागी झाले नाहीत.[३७]

मा.राजारामबापू पाटील यांचे कष्टातून व्यक्तिमत्व घडलेले होते. महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर त्यांच्या रुपाने एक हसरे व कणखर व्यक्तिमत्व आकार घेऊ लागले होते. मुंबई राज्यात धोरण योग्य पध्दतीने आखण्यात महाराष्ट्रीयन नेत्यांचा प्रभाव पडत नाही अशा प्रकारची तीव्र असंतोषाची भावना सर्वत्र पसरली होती. आणि त्यातूनच संयुक्त महाराष्ट्राची चळवळ वाढीस लागली, होती.महाराष्ट्राच्या चळवळीत कॉंग्रेस कोसळते की काय असा बाका प्रसंग त्यावेळी निर्माण झाला होता.मा.यशवंतराव चव्हाण,बाळासाहेब देसाई यांच्या विरोधी वातावरण तयार होत होते अशा कठीण प्रसंगी महाराष्ट्र कॉंग्रेसचे अध्यक्षपद राजारामबापू पाटील यांचेकडे देण्यात आले. ( १९५९ )[३८]

कॉंग्रेसची पुर्नबांधणी --

मा.बापूंनी कॉंग्रेसची पुनर्बांधणी केली.त्यासाठी ते महाराष्ट्रभर फिरले. व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन नवी दिशा व संघटना मजबूत बनविली.कमिटीच्या

बैठका,सभा,कामकाज इत्यादी मधून मा.बापूंनी त्यांच्याशी संबंध साधला,त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्वाचा आणि श्रेष्ठ प्रतिच्या गुणांचा मुंबई राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील जनतेवर चांगला प्रभाव पडला होता. ग्रामीण व शहरी या दोन्ही भागातील जनतेच्या प्रश्नाबाबत ते अत्यंत जागरुक होते. लोकांनी विचारलेल्या तांत्रिक प्रश्नांची देखिल ते आपल्या साध्या व सोप्या भाषेत समाधानकारक अशी उत्तरे देत असत.

पुढे सन १९६५ मध्ये कॅबिनेट महसूल मंत्री झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना 'खाते पुस्तिका' दिली. जमिन मालकांच्या हाती देण्याचा शासकीय पातळीवरचा अत्यंत महत्वाचा निर्णय मा.बापूंनी घेतला.आणि तो प्रत्यक्षात आणला. या त्यांच्या कार्यामुळेच त्यांना आमदार ममदानींनी त्यांचे 'राजा तोडरमल' असे यथार्थ वर्णन केले होते. मा.राजारामबापू रुपी पोलादी नेतृत्वाने हे अवघड व जोखमीचे काम राज्यातील एकंदर परिस्थिती स्थिर नसतानाही कायदा व सुव्यवस्था उत्तम राखण्याचे अवघड कार्य केले म्हणूनच त्यांना त्या काळामध्ये मा.मुख्यमंत्र्याचे उजवे हात समजले जात होते.[३९]

मा.बापूंनी कोणत्याही खात्याचे मंत्रिपद चालविताना सत्तेचा योग्य तो उपयोग करुन लोक कल्याणाच्या नव-नव्या योजना आखून त्या व्यवस्थितपणे पार पाडण्याचे व्रत मा.श्री राजारामबापू पाटील अखंडपणे सावरत होते.परंतु ज्या क्षेत्रामध्ये त्यांच्या मंत्रीपदाचा साक्षात संबंध नाही अशा क्षेत्रात सामाजिक जीवनाच्या विकासाच्या वृत्तीने काही ना काही उपयुक्त कार्ये आपल्या हातून घडावे अशी ही त्यांची नित्य खटपट चालू होती.राजारामबापू पाटील हे केवळ राजकारणी पुरुष नाहीत तर ते एक उच्च अभिरुचीचे रसिक होते. साहित्य व नाट्य,संगीत इत्यादी कलांचे मार्मिक आणि समंजस भोक्ते होते.[४०]

पुतळा उभारणीस पाठींबा --

महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराजांचा,समर्थ रामदासाचा व श्री ज्ञानेश्वरांचा ,तुकारामांचा देश आहे. छत्रपती शिवाजी महाराज,लोकमान्य टिळक आणि महात्मा फुले महाराष्ट्राचे दैवते आहेत.छत्रपती शिवाजी महाराज हे

राजारामबापू पाटील यांची मोठी प्रेरणा होती. गेट वे ऑफ इंडिया समोर हा पुतळा होऊ नये यासाठी मुंबईतील काही कारस्थानी लोकांनी कट केला. परंतु राजारामबापू पाटील यांनी या पुतळ्याचा पुरस्कार केला व त्यास पूर्ण पाठींबा दिला.मोठया निर्धाराने त्या भव्य पुतळ्यांचे काम पूर्ण केले.त्यामध्ये कै.बाळासाहेब देसाई यांचेही कार्य महानआहे.[४१]

राजारामबापू पाटील हे गरीबांचे ,कष्टक-याचे ,बहुजन समाजाचे नेते होते. त्यांना सामाजिक कार्यात विशेष रस होता.बहुजन समाजाच्या गर्दीवर प्रेम करणारे आणि त्या गर्दीत स्वत:ला हरवून जाणारे होते. सर्वसामान्य जनतेवर व समाजावर त्यांचे अमाप प्रेम होते.त्याच्या कार्याचा व प्रशासनाचा महत्वाचा पैलू म्हणजे बहुजन समाजासाठी त्यांनी केलेले कार्य होय. कायदे हे लोकांच्या हितासाठी असतात.शासन हे लोकांच्या कल्याणासाठी आहे.कायदे राबविण्यासाठी जनता नाही.जनतेसाठी कायदे आहेत व अशा प्रकारचीदूरदृष्टी असलेला कणखर प्रशासक म्हणजे श्री राजारामबापू पाटील हेच होय.[४२]

लोक कल्याणासाठी तळमळ बाळगणारे एक मंत्री म्हणूनच राजारामबापू पाटील लोकप्रिय नाहीत तर शासनाच्या कक्षेबाहेरील अनेक कार्यातही रस घेणारे व जनहीताच्या योजनांना चालना देणारे एक क्रिडाप्रेमी,कलाप्रेमी नेते म्हणूनही सर्वसामान्य जनतेचा आदरभाव व प्रेम बापूंनी मिळविले.सरकारच्या खुर्चीवर मा.बापू ज्यावेळी बसतात तेव्हा त्या स्थानाला आवश्यक तो कठोरपणा आणि दरारा त्यांच्या ठिकाणी होता. परंतु राज्यकर्त्यांची भूमिका सोडून ते जेव्हा सामान्य माणसामध्ये फिरतात तेव्हा त्यांच्या स्वभावातील सारे भाव प्रकट होतात. जे जे चांगले असेल त्यांचे कौतक करणारे गुणग्राहक वृत्तीचे कलेचा रसस्वाद घेणारे अशा प्रकारचे त्याचे दर्शन लोकांना होते.[४३]

मा.बापू - उद्योग व वीजमंत्री --

कै.श्री.राजारामबापू पाटील हे इ.स.१९६७ च्या विधानसभेच्या निवडणूकीत विजयी झाले व त्यामुळे महाराष्ट्र विधानसभेवर त्यांची फेर निवड होऊन त्यांना

महाराष्ट्र मंत्रिमंडळामध्ये उद्योग व वीज ही अत्यंत महत्वाची खाती देण्यात आली. एका दृष्टीने त्याकाळी महाराष्ट्राचे उद्योगखाते हे एक आव्हानात्मक मा.बापूंनी त्याकाळात अतिशय काळजीपूर्वक सांभाळून संपूर्ण महाराष्ट्रभर उद्योगधंदे कसे निर्माण होतील व कारखानदार,उद्योगपती ,व्यापारी यांच्यात विश्वास कसा निर्माण होईल या दृष्टिकोनातून त्यांनी त्यांच्यासाठी अनेक सुविधा उपलब्ध करुन दिल्या व उद्योग धंद्यास प्रोत्साहन दिले.[४४]

श्री राजारामबापू पाटील यांना समाजातील शेवटच्या थरातल्या शेवटच्या माणसाबद्दल उपजत प्रेम होते. ग्रामीण भागात त्यांचे बरेचसे आयुष्य गेल्यामुळे खेड्यापाड्यातील दारिद्र्य त्यांनी जवळून पाहिले होते. त्यामुळे कदाचित त्यांच्यामध्ये हे प्रेम बाल्यावस्थेतच निर्माण झाले असावे.कदाचित महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातूनही त्यांच्यामध्ये हा जिव्हाळा निर्माण झाला असेल त्यांच्या कुटूंबातून त्यांच्यावर लहानपणीच ज्ञानेश्वर,तुकाराम यांच्या परंपरेचे संस्कार झाले होते. करुणा हाच महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर,एकनाथ व तुकाराम,यांच्या परंपरेचा गाभा आहे. परंतु या एका प्रेरणेमुळेच ते आपल्या आयुष्यात ४० वर्षे अविश्रांत कार्य करु शकले.[४५]

## वाळवा तालुका ग्राहक भांडार --

सन १९६८ मध्ये त्यांनी वाळवा तालुका ग्राहक भांडाराची स्थापना केली. त्याच बरोबर सन १९६९ मध्ये उद्योगधंद्यात प्रोत्साहन देण्यासाठी वाळवा सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली.तसेच आपल्या देशातील उद्योगधंद्याना वाढीस लागणाऱ्या अनेक घटकांची माहिती व्हावी,यासाठी त्यांनी सन १९७० मध्ये उद्योग-विकास अभ्यासासाठी जपान व अमेरिकेसारख्या प्रगतशिल देशांचा दौरा करुन तेथील सर्व उद्योगधंद्याची व विकासाची मुळापासूनची माहिती घेऊन व त्यांचा सखोल अभ्यास करुन भारतीय लोकांना तेथील उद्योगांची माहिती व्हावी व प्रेरणा मिळावी यासाठी त्यांनी सन १९७१ मध्ये लोकशाहीची क्षितिजे व आधुनिक जपान अशी भारतीय लोकाना वरदान ठरावीत अशा पुस्तकांचे लेखन केले.[४६]

तिसरी विधान सभा निवडणूक ( १९७२ )

सन १९७२ मध्ये राजारामबापू पाटील यांची विधानसभा निवडणुकीत वाळवा मतदार संघातून महाराष्ट्रामध्ये प्रचंड मताधिक्क्याने निवड झाली. त्यावेळी जनतेचे प्रश्न परखडपणे व प्रभाविपणे मांडणारा सत्ताधारी पक्षातील जागृत नेता म्हणून नावलौकिक मिळविला. मा. बापू सन १९६२ ते १९७२ पर्यन्त दहावर्ष महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये होते. सन १९७२ मध्ये निवडून आल्यानंतर त्यांना मंत्रिमंडळातून वगळण्यात आले पण सामान्य शेतकऱ्यांच्या प्रश्नावर नि:स्पृहपणे बोलण्याचे आणि त्यांच्यासाठी झगडण्याचे काम त्यांनी सतत चालू ठेवले. मंत्रिपद गेल्यानंतर ते एस.टी. मधून प्रवास करीत होते. हा केवळ त्यांचा स्टंट नव्हता. मा. बापू हे अतिशय प्रामाणिक आणि कळकळीचे कार्यकर्ते होते. ही कळकळ त्यांच्या नेहमीच्या आचरणातून सहजपणे दिसून येते. त्यांना पटलेली कोणतीही गोष्ट करण्यात त्यांच्याकडून अंगचोरपणा होत नसे.[४७]

सुजगांव पाणी परिषदेत सहभाग --

१७ जून १९७३ मध्ये सुजगांव परिषदेत शेतकऱ्यांचे जीवन सुजलां सुफलां व्हावे म्हणून वारणा धरणातून पाटाचे पाणी मिळावे या मागणीसाठी एक लाखाची विराट शेतकरी परिषद घेणारे व धरणास विरोध करणाऱ्या स्वपक्षीयांशी संघर्ष करणारे महाराष्ट्रातील व सांगलीतील ते एकमेव लोक नेते राजारामबापू पाटील हेच होते. मा. बापूंनी सत्तेचा वापर गोरगरीब व सामान्य लोकांच्या कल्याणाकरिता केला. बहुजन समाजाची कामे करण्याकरता त्यांनी आयुष्यभर धडपड केली. स्वत:च्या प्रकृतीची चिंता न करता सामान्य माणसापर्यन्त ते पोहोचत असत त्यांच्यात मिसळत असत.[४८]

सन १९७५ ची आणीबाणी आणि काँग्रेस पक्षाचा त्याग --

सन १९७५ मध्ये आणीबाणीच्या काळात मा. बापूंनी पदयात्रा काढण्यासाठी वाळवे तालुक्यातील ९७ गांवाची व ६५० कि.मी. ची पदयात्रा काढली,

व वीस कलमी कार्यक्रमाचा प्रचार केला पण केवळ त्यानाच हसण्यात काय हशील आहे ? एकूण एक कॉंग्रेसवाले त्याकाळामध्ये पूर्णपणे ठेपाळले होते आणीबाणीच्या काळात कॉंग्रेस नेत्यांच्याकडून अनेक चुका झाल्या.मा.कै.इंदिरा गांधी व मा.संजय गांधी यांचे जबरदस्त वर्चस्व वाढले होते. अनेक जुन्या कॉंग्रेस नेत्यांना अपमानाची वागणूक कॉंग्रेस पक्षात मिळू लागली.देशातील अनेक नेते कॉंग्रेस पक्षाचा त्याग करुन नवीन पक्षामध्ये जाऊ लागले. महाराष्ट्रात मा.राजारामबापू पाटील यांनी पण जनता पक्षात प्रवेश केला. ( १६ एप्रिल १९७७ ) व त्यांचा राज्यकारभारातील अनुभव लक्षात घेऊन त्यांना शहादा येथील जनता पक्षाच्या राज्य अधिवेशनात महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष करण्यात आले ( १९८० )[४९]

मा.बापूंची महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवड ( १९८० ) --

मा.बापू जनता पक्षाशी निष्ठावंत राहतील याची खात्री असल्यामुळेच त्यांना महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष पद दिले होते.त्यावेळी लिहिताना पक्षाचा हा निर्णय सुज्ञपणाचा आहे असे म्हटले होते. महाराष्ट्रातील कॉंग्रेसजनांत दादा मुख्यमंत्री झाल्यानंतर एकप्रकारचे औदासिन्य निर्माण झाले होते आणि त्याचाच आणखी एक परिपाक म्हणजे मा.बाळासाहेब सावंत,शंकरराव चव्हाण,बाळासाहेब विखे-पाटील यांनी महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेस म्हणून एक पक्ष त्यावेळी स्थापन केला.पण पुढे ही सर्व मंडळी तसेच मा.वसंतदादा पाटील ही इंदिरा कॉंग्रेसमध्ये परत आले पण मा.बापू मात्र परतले नाहीत.त्यांना इंदिरा कॉंग्रेसमधून बाहेर जाण्याची परिस्थिती निर्माण झाली.याबद्दल किती यातना झाल्या असतील याची कल्पना न केलेली बरी ते एक लोकप्रिय नेते होते. ते महाराष्ट्रातील जनता पक्षाचे अध्यक्ष होते. तरी इंदिराजींच्या बद्दल त्यांनी एकही अवाक्षर ते कधीही बोलले नाहीत हे सर्व लिहिण्याचा उद्देश्य केवळ वस्तुस्थिती कथन हाच आहे.त्यातून बापूंचे राजकीय पैलू व तात्वीक ठामपणा दिसून येतो.त्यासाठी मतप्रदर्शन करण्याचीही जरुरी नाही.[५०]

स्वत:ला सेक्युलर,लोकशाहीवादी व समाजवादी म्हणवणारे आज तरी अनेक नेते आहेत. परंतु खोल विचाराने व ज्वलंत कृतीने धर्मनिरपेक्षता पाळणारा, समाजवादी कृती करणारा व लोकशाहीमध्ये लोकाभिमुख असणारा मा.बापूंच्या

सारखा नेता क्वचितच दिसे. बापूंचे जीवन ख-या अर्थाने संपूर्ण महाराष्ट्राला दिपज्योत ठरेल असेच होते. महाराष्ट्रात जी कर्तबगार आणि थोर माणसे झाली त्या इतिहासामध्ये मा.राजारामबापू पाटील यांचे नांव निश्चितच नमूद झाल्याशिवाय राहणार नाही असे त्याचे व्यक्तिमत्व होते.[५१]

विधान परिषद सदस्य --

१६ एप्रिल १९७७ मध्ये कॉंग्रेस पक्षाचा त्याग व लोकशाही कॉंग्रेसमध्ये प्रवेश व त्यानंतर जनता पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.याचवेळी सन १९७८ मध्ये त्यांची मुंबई महापालिका मतदार संघातून महाराष्ट्र विधान परिषदेवर निवड करण्यात आली. पुढे सन १९७८ मध्ये पुरोगामी लोकशाही आघाडीच्या मंत्रिमंडळात मुख्यमंत्री मा.श्री शरद पवार यांच्या मंत्रिमंडळामध्ये त्यांना ग्रामीण विकास व कायदा व न्याय खात्याचे मंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यावेळी त्यांनी वाळवा तालुक्यामध्ये शेतकरी विणकरी सहकारी सुत गिरणीची स्थापना केली होती.[५२]

शेतकरी दिंडी - ( १९८० )

सन १९८० मध्ये मा.राजारामबापू पाटील यांनी शेतक-यांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व शेतक-यांच्या मागण्यासाठी दि.७-१२-८० ते २३-१२-८० या काळामध्ये जळगांव ते नागपूर पर्यन्त शेतकरी दिंडी ४६५ कि.मी.पदयात्रा काढली व शेतकरी वर्गाच्यासमस्या सरकारला सादर केल्या. शेतक-यांच्या प्रश्नासाठी त्यांच्या मालाला योग्य भाव बांधून मिळावेत ते भाव उत्पादनाशी निगडित असावेत,यासाठी त्यांनी ही शेतकरी दिंडी काढलेली होती व त्याचे नेतृत्व मा.बापूंच्याकडे होते.[५३]

श्री महांकाली सह-साखर कारखान्याची क्वठे महांकाळ येथे स्थापना ( १९८२ ) -

मा.बापूंनी सन १९८२ मध्ये दुष्काळी भागाचे प्रश्न समजावून घेण्यासाठी दि २ ते ११ ऑक्टोबर १९८२ या काळात त्यांनी महाराष्ट्रामध्ये सांगली ते उमदी २५० कि.मी.पदयात्रा काढली.ग्रामीण व दुष्काळी भागाचा विकास घडवून

व वीस कलमी कार्यक्रमाचा प्रचार केला पण केवळ त्यानाच हसण्यात काय हशील आहे ? एकूण एक कॉंग्रेसवाले त्याकाळामध्ये पूर्णपणे ठेपाळले होते आणिबाणीच्या काळात कॉंग्रेस नेत्यांच्याकडून अनेक चुका झाल्या.मा.कै.इंदिरा गांधी व मा.संजय गांधी यांचे जबरदस्त वर्चस्व वाढले होते. अनेक जुन्या कॉंग्रेस नेत्यांना अपमानाची वागणूक कॉंग्रेस पक्षात मिळू लागली.देशातील अनेक नेते कॉंग्रेस पक्षाचा त्याग करुन नवीन पक्षामध्ये जाऊ लागले. महाराष्ट्रात मा.राजारामबापू पाटील यांनी पण जनता पक्षात प्रवेश केला. ( १६ एप्रिल १९७७ ) व त्यांचा राज्यकारभारातील अनुभव लक्षात घेऊन त्यांना शहादा येथील जनता पक्षाच्या राज्य अधिवेशनात महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष करण्यात आले ( १९८० )[४९]

मा.बापूंची महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष म्हणून निवड ( १९८० ) --

मा.बापू जनता पक्षाशी निष्ठावंत राहतील याची खात्री असल्यामुळेच त्यांना महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष पद दिले होते.त्यावेळी लिहिताना पक्षाचा हा निर्णय सुज्ञपणाचा आहे असे म्हटले होते. महाराष्ट्रातील कॉंग्रेसजनांत दादा मुख्यमंत्री झाल्यानंतर एकप्रकारचे औदासिन्य निर्माण झाले होते आणि त्याचाच आणखी एक परिपाक म्हणजे मा.बाळासाहेब सावंत,शंकरराव चव्हाण,बाळासाहेब विखे-पाटील यांनी महाराष्ट्र समाजवादी कॉंग्रेस म्हणून एक पक्ष त्यावेळी स्थापन केला.पण पुढे ही सर्व मंडळी तसेच मा.वसंतदाद पाटील ही इंदिरा कॉंग्रेसमध्ये परत आले पण मा.बापू मात्र परतले नाहीत.त्यांना इंदिरा कॉंग्रेसमधून बाहेर जाण्याची परिस्थिती निर्माण झाली.याबद्दल किती यातना झाल्या असतील याची कल्पना न केलेली बरी ते एक लोकप्रिय नेते होते. ते महाराष्ट्रातील जनता पक्षाचे अध्यक्ष होते. तरी इंदिराजींच्या बद्दल त्यांनी एकही अवाक्षर ते कधीही बोलले नाहीत हे सर्व लिहिण्याचा उद्देश्य केवळ वस्तुस्थिती कथन हाच आहे.त्यातून बापूंचे राजकीय पैलू व तात्वीक ठामपणा दिसून येतो.त्यासाठी मतप्रदर्शन करण्याचीही जरुरी नाही.[५०]

स्वत:ला सेक्युलर,लोकशाहीवादी व समाजवादी म्हणवणारे आज तरी अनेक नेते आहेत. परंतु खोल विचाराने व ज्वलंत कृतीने धर्मनिरपेक्षता पाळणारा, समाजवादी कृती करणारा व लोकशाहीमध्ये लोकाभिमुख असणारा मा.बापूंच्या

आणण्यासाठी तसेच जत,कवठेमहंकाळ तालुक्यांचा वाळवा तालुक्याप्रमाणेच विकास व उद्योगधंदे वाढविण्यासाठी गरिबी हटविण्यासाठी तेथील लोकांना विकसित करण्यासाठी त्यांनी १९८२ मध्ये सांगली जिल्हातील कवठेमहंकाळ या तालुक्यामध्ये तेथील लोकांना विश्वासात घेऊन श्री महंकाळी सह-साखर कारखाना लि.,कवठेमहंकाळ ची स्थापना करण्यात आली.[५४] मा.बापूंच्या मुत्यूनंतर या परिसरात राजारामबापू - नगर असे नांव देण्यात आले आहे.

मा.श्री चंद्रशेखर यांच्या समवेत पदयात्रेत सामील --

दि.१-४-१९८३ ते ११-५-१९८३ या काळामध्ये भारतयात्रा मा. श्री चंद्रशेखर यांचे समवेत कागल ते बिजासन(धुळे ) पर्यन्त ११०० कि.मी.पदयात्रा काढून महाराष्ट्रातील दु:खदैन्याची ते आपल्या भाषणातून सत्य परिस्थितीची हजरी घेत होते. त्यांच्या जीवनात त्यांनी मोठ मोठ्या पदावरती काम केले .अनेक तरुणांना प्रोत्साहन दिले.या कार्याबद्दल मा.चंद्रशेखर ,समाजवादी विचारवंत एस.एम.जोशी यांनी त्यांच्या कार्याची योग्य वेळी दखल घेतली होती.[५५]

साखराळे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्र निकेतनची स्थापना ( १९८३ ) --

मा.बापूंनी आपल्या परिसरातील वाळवा सहकारी साखर कारखाना एक आदर्श कारखाना म्हणून सर्वांच्या समोर ठेवलेला होता.त्याला जोडून त्यांनी अनेक छोटे मोठे उद्योगधंदे ,कृषी औद्योगिक क्रांती सर्वसामान्यांच्या हितासाठी राबविल्या तसेच गोरगरीब व सामान्य असणाऱ्या आधुनिक पध्दतीचे ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी त्यांनी सन १९८३ मध्ये साखराळे येथे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्र निकेतनची स्थापना करुन बहुजन मुलांच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करुन दिली.[५६]

विदर्भातील जनतेकडून रौप्यतुला --

मा.बापूंनी जनता पक्षामध्ये प्रवेश केल्यानंतर अतिशय प्रामाणिकपणे हा पक्ष वाढविण्यामध्ये व सर्वसामान्य जनते पर्यन्त पोहचविण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे जनता पक्षास भक्कम बनविण्याचा व त्या द्वारे गोरगरीब लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला. या कार्याची योग्य वेळी दखल घेऊन

रामटेक ( नागपूर ) येथे सन १९८३ मध्ये दिर्मातील जनतेने मोठया प्रेमाने गैारव-प्रित्यर्थ रैाप्यतुला केली ती इतिहासात प्रसिध्द आहे.[५७]

शेवटचे दिवस व निधन --

अशा प्रकारची सार्वजनिक कार्य सुरु असतानाच ९ जानेवारी १९८४ रोजी मा.राजारामबापू सर्दीच्या आजाराने हॉस्पिटलमध्ये दाखल झाले,याची माहिती मिळताच महाराष्ट्रातील सर्व पक्षसंघटनेच्या संदर्मातील सर्व जाणकार लोकांनी प्रत्यक्ष येऊन काही तारा करुन तर जवळजवळ १००० लोकांनी पत्रे पाठवून त्यांची मोठया प्रेमाने चैाकशी केली. परंतु ईश्वर इच्छे पुढे कोणाचेच काही चालत नाही त्याचे ईश्वर कार्य संपताच त्याचे मंगळवार दिनांक १७ जानेवारी १९८४ मध्ये दुपारी २-४५ वाजता मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटलमध्ये प्राणज्योत मालवली. मा.राजारामबापू पाटील यांचे कर्तृत्वशाली,हसरे नि उमदे व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड कायमचे गेले. निधन समयी त्यांचे वय ६४ वर्षांचे होते.

# संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १ | पाटील बा.ल. | - लढकपात्र, पुणे (१९७० ),पृ.९ |
| २ | कित्ता | - पृ.१० |
| ३ | पाटील लालासाहेब कृ. उरूण-इस्लामपूर | - मुलाखत,दि.३०-१०-१९९३,वय ५०. |
| ४ | दै.प्रतिध्वनी,सांगली | - लेख - एक धगधगता जीवनपट-राजारामबापू पाटील दि.१७-१-१९८५.,पृ.३. |
| ५ | कित्ता | - |
| ६ | श्री आत्तार सी.जी.,माजी मुख्याध्यापक,आझाद विद्यालय, कासेगांव. | - मुलाखत, दि.३०-९-१९९३,वय ६२. |
| ७ | कित्ता | - |
| ८ | दै.अग्रदूत ,सांगली | - लेख.कर्तृत्वाचा आदर्श मा.राजारामबापू दि.१७-१-१९८६,पृ.३. |
| ९ | दै.राष्ट्रशक्ती,सांगली | दि.१७-१-१९८९, पृ.४. |
| १० | श्री ढवळीकर बी.आर. माजी मुख्याध्यापक,आझाद विद्यालय,कासेगांव | - मुलाखत, दि.२५-९-१९९३,वय ६७. |
| ११ | कित्ता | -,,- |
| ११ | पाटील बा.ल. | - लढकपात्र - पुणे (१-८-१९७०),पृ.१७. |
| १२ | कित्ता | - -,,- |
| १३ | श्री माने आप्पासाहेब,माजी मुख्याध्यापक,आझाद विद्यालय, कासेगांव | - मुलाखत,दि.३०-११-१९९३,वय - ६३. |

| | | |
|---|---|---|
| १४ श्री देशपांडे हरिभाऊ(काका) उपाध्यक्ष,कासेगांव शिक्षण संस्था,कासेगाव. | - | मुलाखत - दि.२५-६-१९९३,वय ८३. |
| १५ - कित्ता - | - | - ,, - |
| १६ दै.अग्रदूत सांगली | - | कै.राजारामबापू पाटील,शिक्षण प्रेमी, दि.१७-१-१९८५,पृ.२. |
| १७ - ,,--कित्ता | - | -,,- |
| १८ श्री पतकी व्यंकाप्पा,सांगली | - | अश्वत्यवृक्ष,लेख दि.१७ जानेवारी,१९८५, प्रकाशक - मा.राजारामबापू पाटील स्मरणिका,चैतन्यस्मरण,पृ.४३. |
| १९ श्री पुजारी बा.मा.,सांगली | - | वाळवे तालुक्यातील नवी मनुस्मृती देणारा नेता,दि.१७ जाने.,१९८५, प्रकाशक - मा.राजारामबापू पाटील स्मरणिका - इस्लामपूर,चैतन्यस्मरण,पृ.२७. |
| २० कित्ता | | -,,- |
| २१ दै.सागर(चिपळूण) | - | एक जाणता संघटक हरपला,दि.१७-१-८६ विशेष स्मरण,संपा.वसंत विष्णू पाटील, पृ.३२. |
| २२ पाटील शंकर खंडू,कोल्हापूर | - | माणुसकीने रसरसलेले सागरफूल,दि.१७ जान, १९८५,प्रका.मा.राजारामबापू पाटील स्मर--णिका - इस्लामपूर,चैतन्यस्मरण,पृ.३२. |
| २३ कारखानीस टी.एस.,कोल्हापूर | - | राजारामबापू : काही आठवणी, १७ जाने.,१९८५, प्रकाशक-मा.राजारामबापू पाटील स्मरणिका इस्लामपूर,चैतन्यस्मरण, पृ.१६. |

| | | |
|---|---|---|
| २४ | दै.नवशक्ती,मुंबई | - कै.राजारामबापू पाटील , १७ जाने.,१९८६,पृ.१९, विशेष स्मरण,संपादक - वसंत विष्णू पाटील. |
| २५ | श्री गरुड शांताराम, ईचलकरंजी | - कार्य आणि कार्यकर्ते उभे करणारा नेता, दि.१७ जाने.,१९८५, प्रकाशक मा.राजारामबापू पाटील स्मरणिका। इस्लामपूर,चैतन्य स्मरण,पृ.२. |
| २६ | कित्ता | - - ,, - |
| २७ | दै.प्रतिध्वनी,सांगली | - दि.१७-१-८६,पृ.३. |
| २८ | - कित्ता - | - -,,- |
| २९ | साळवी पी.जी., आय.ए.एस., मुंबई | - बापू म्हणजे निरंतर सौजन्य, दि.१७-१-८६,पृ.१९, राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनी, इस्लामपूर,संपादक-पाटील शामराव. |
| ३० | - कित्ता - | - -,,- |
| ३१ | दै.प्रभात पुणे | - एक कृतिशिल व्यक्तिमत्व, दि.१७-१-८६, पृ.२४, विशेष स्मरण संपादक - वसंत विष्णू पाटील. |
| ३२ | दै.सकाळ,कोल्हापूर | लेख - उमदा नेता हरपला,दि.१७-१-८६,पृ.३५, विशेषस्मरण संपादक - वसंत विष्णू पाटील. |
| ३३ | - कित्ता - | - -,,- |
| ३४ | श्री चौधरी पंढरीनाथ | - गुणग्राहकता - लेख,दि.१७-१-८६,पृ.२५, राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनी, इस्लामपूर,संपादक - पाटील शामराव. |

| | | |
|---|---|---|
| ३५ | श्री व्यकाप्पा पतकी सांगली. | - लेख लोकजीवनाचा मार्गदर्शक, दि.१६ ऑगस्ट,१९८६,पृ.११. राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनी, इस्लामपूर,संपादक - पाटील शामराव. |
| ३६ | कित्ता | - -,,- |
| ३७ | प्रा.पाटील एल.के., उरुण इस्लामपूर | - लेख - जनतेचा राजा गेला व रामही गेला, दि.१७ जाने.,१९८६,पृ.८०, विशेष स्मरण - संपादक - वसंत विष्णू पाटील. |
| ३८ | कित्ता | - - ,, - |
| ३९ | पाटील शंकर संदु,कोल्हापूर | - माणुसकीने रसरसलेले सागरफूल , १७-१-८५,प्रकाशक - राजारामबापू पाटील स्मरणिका - इस्लामपूर,चैतन्यस्मरण,पृ.३३. |
| ४० | कित्ता | - -,,- |
| ४१ | देशपांडे हरिभाऊ(काका) उपाध्यक्ष,कासेगांव शिक्षण संस्था, | - मुलाखत - दि.२५-०६-१९९३,वय - ८३. |
| ४२ | कित्ता | - -,,- |
| ४३ | प्रा.मगुडकर मा.प.,पुणे | - राजारामबापू पाटील महाराष्ट्राला मिळालेला वारसा - लेख, १७ जाने.,१९८६, प्रकाशक - राजारामबापू पाटील ज्ञान - प्रबोधिनी,इस्लामपूर,पृ.३०. |
| ४४ | कित्ता | - -,,- |
| ४५ | लोकराज्य | - दि.१६ जून १९७९,पृ.२५. संपादक - ईश्वरराज माथूर |
| ४६ | कित्ता | - -,,- |
| ४७ | कित्ता | - -,,- पृ.२६ |

| | | |
|---|---|---|
| ४८ | श्री सैन्दे शामराव कासेगांव माजी डेप्युटी कलेक्टर. | - मुलाखत, दि. २९-९-९३, वय - ६५. |
| ४९ | कित्ता | - -,,- |
| ५० | दै. नवशक्ती, मुंबई | - दि. १७-१-८६, पृ. २, विशेष स्मरण - संपादक - वसंत विष्णू पाटील. |
| ५१ | कित्ता | - -,,- |
| ५२ | दै. महाराष्ट्र टाईम्स, मुंबई | - दि. १७-१-८६, पृ. ४६, विशेष स्मरण - संपादक - वसंत विष्णू पाटील. |
| ५३ | कित्ता | - -,,- |
| ५४ | दै. सत्यवादी, कोल्हापूर | - दि. १७-१-८६, पा. नं. ३९, विशेष स्मरण - संपादक - वसंत विष्णू पाटील. |
| ५५ | कित्ता | - -,,- |
| ५६ | प्रा. पाटील लालासो कृ. ऊरुण इस्लामपुर | - मुलाखत, दि. ३०-१०-९३, पृ. ६ वय - ५०. |
| ५६ | - कित्ता - | - दै. अग्रदूत, सांगली, लेख ४-१०-८६, पृ. ६ |
| ५७ | कित्ता | - दै. प्रतिध्वनी, सांगली, दि. १७-१-८५, पृ. २. |